|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University , Jalgaon**

'A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

## राष्ट्रीय सेवा योजना कक्ष

जा.क्र.कबचौउमवि/रासेयो-१४-क/अध्यादेश/१६३/१२७/२०२५ दि.२१/०३/२०२५

**प्रति,**

मा.प्राचार्य / संचालक / विभाग प्रमुख,
राष्ट्रीय सेवा योजनेचे शासन अनुदानित व स्वंयनिर्वाहित एकक असलेले महाविद्यालये,
मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना...

**विषय :-** विद्यापीठ अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्साहन गुणांचे MKCL ADES पध्दतीने Entry करणेबाबत...

**संदर्भ:-**जा.क्र.कबचौउमवि/रासेयो-१४-क/अध्यादेश/१६३/११३/२०२५, दि.०८/०३/२०२५

**महोदय/ महोदया,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव संलग्न महाविद्यालय,मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा विभाग यामध्ये नियमित शिक्षण घेणारे विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) उपक्रमात सहभागी होऊन सलग दोन शैक्षणिक वर्षात सहभाग व त्या कालावधीत एक विशेष शिबीर पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार विद्यापीठ अध्यादेश १६३ तरतूदी अंतर्गत प्रोत्साहनपर १० गुणांचा लाभ आपल्या शिफारसी अन्वये दरवर्षी देण्यात येत असतो. त्या अन्वये संदर्भीय परिपत्रकान्वये आवाहन करुन अध्यादेश १६३ नुसार प्रोत्साहन पर गुणलाभ मिळण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज अभासी पध्दतीने (Online) दि.२५ मार्च,२०२५ पर्यंत कार्यवाही करण्याविषयी आपणास कळविण्यात आलेले आहे.

अध्यादेश गुणलाभ कार्य जलद होण्याकरीता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ या सलग शैक्षणिक वर्षात **राष्ट्रीय सेवा योजनेत (NSS)** सहभागी होऊन एक विशेष शिबीर (सात दिवसीय निवासी) पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचे अध्यादेश १६३ नुसार प्रोत्साहनपर गुण मा.प्राचार्य, संचालक, विभाग प्रमुख यांचेकडून ई-पध्दतीने (MKCL ADES पध्दतीने Entry) करण्याच्या कार्यपध्दती खालील प्रमाणे वापरण्यात यावी.

१. विद्यापीठ अध्यादेश क्र.१६३ (NSS) राष्ट्रीय सेवा योजना तरतुदीनुसार पात्र विद्यार्थ्यांच्या गुण याद्यांच्या त्रुटींचे निराकरण झाल्यानंतर MKCL ने विकसित केलेला Assesment Data Entry Software (ADES) द्वारे राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्राअंतर्गत प्रोत्साहनपर १० गुणांची नोंदणी करावयाची आहे.

२. विद्यापीठ अध्यादेश क्र. १६३ राष्ट्रीय सेवा योजना तरतुदीनुसार Assesment Data Entry Software (ADES) द्वारे तयार झालेल्या गुणयाद्या व सोबतच्या नमुन्यातील हमीपत्र महाविद्यालय लॅागीन मध्ये Assesment Data Entry -- >> Report -- >> Marks List या Link द्वारे तयार कराव्यात.

३. Software द्वारे तयार केलेल्या गुणयाद्यांची प्रिंट अचुक असल्याची खात्री संबंधित राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी करावी.काही दुरुस्त्या असल्यास अश्या दुरुस्त्या Software मध्ये घेण्यात याव्यात.त्याची Correction List Print घेवून त्यावर संबंधित राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी आणि मा.प्राचार्य /संचालक /विभागप्रमुख यांनी सदर Software Print प्रमाणित करुन त्यावर स्वाक्षरी करुन आपला शिक्का प्रकट करावा या गुणयाद्या ई-पध्दतीने राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या nss@nmu.ac.in या ई-पत्यावर दि.१५/०४/२०२५ रोजी किंवा तत्पुर्वी पाठवाव्यात.त्याची Hard Copy दि. २५/०४/२०२५ पर्यंत रासेयो कक्षास सादर करावी. दि.१५/०४/२०२५ रोजी सदर online गुण सादर करावयाची Link MKCL मार्फत बंद करण्यात येईल.

आपणास कळविण्यात येते की,पत्रकातील निर्देशाप्रमाणे कार्यवाही करुन Assesment Data Entry Sofware (ADES) द्वारे विद्याशाखा, वर्गनिहाय,अशा वेगवेगळ्या (स्वतंत्र) पध्दतीने प्रिंटकाढून रासेयो कक्षास जमा करण्यात यावी.

**टिप:- अभासी पध्दतीने (online) ज्या रासेयो स्वंयसेवकांची माहिती परीपूर्ण अपलोड केलेली असेल अशाच स्वंयसेसकांची अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्साहन गुणांचे MKCL ADES पध्दतीने Entry करण्यात यावी.**

आपला विश्वासू,

(डॉ. सचिन ज.नांद्रे)
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना

**प्रतिलिपी-**

१) मा.संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौउमवि,जळगाव
२) समन्वयक, विद्यार्थी ई- सुविधा कक्ष (MKCL), कबचौउमवि,जळगाव
३) विभाग-जिल्हा रासेयो समन्वयक

**प्रत :-**

१) विभागप्रमुख,कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगाव.
२) विभागप्रमुख,प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि,जळगाव.
३) विभागप्रमुख,कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि,जळगाव.
४) पध्दती विश्लेषक,संगणकशास्त्र प्रशाळा,कबचौउमवि,जळगाव.

D/kka/0.163 Circular/127/2024-25